# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ४ टप्प्यात

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): राज्यात मागील काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. मागील तीन वर्षापासून महापालिका आणि जिल्हा परिषदांचा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. दरम्यान, आता या वर्षातच महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. याबाबत सर्व पक्षांनी तयारी सुरू केली आहे. निवडणुकांबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.

राज्यात ऑक्टोंबरपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका वेगवेगळ्या होणार आहेत. याबाबत निवडणूक आयोगाकडून लवकरच वेळापत्रक येऊ शकते.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार टप्प्यांमध्ये होणार आहेत. ऑक्टोंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच मतदानाला सुरुवात होणार असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत आता निवडणूक आयोग तयारी करत आहे.

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०२० पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. पण, या निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत.

दरम्यान, जिल्हा परिषद, महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टाने ६ मे रोजी निर्णय दिला. ओबीसींना २०२२ पूर्वी असलेले आरक्षण कायम ठेवून सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले. चार आठवड्यांच्या आता निवडणुकांसदर्भातील अधिसूचना काढण्यासही सुप्रीम कोर्टाने सांगितले होते.

२०२२ मध्ये बांठिया आयोगाचा अहवाल सादर होण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाला महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५ वर्षांपर्यंत निवडणुका झाल्या नसल्याचे कोर्टाने नमूद केले. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला ४ आठवड्यांच्या आत निवडणुकीची अधिसूचना काढण्याचे निर्देश दिले आहेत.





सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar





बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २६८ वा ■ सोमवार २३ जून २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २४ जून २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 268 ■ Monday 23 June 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027



### चकलांबा पोलीस ठाण्याच्या पो.नि.संदीप पाटलांनी एस.पी.च्या चांगल्या कारभाराला कलंक लावायचा ठेका घेतला का?

# चकलांबा पोलीस ठाणे हद्दीत अवैध वाळू उपसा; वाळू पट्ट्यात देखरेखीला कोण?

## पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत साहेब,वाळू माफियाला पोसणाऱ्या पो.नि.संदीप पाटीलवर कारवाई करा

बीड (सरकार): गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पो.नि.संदीप पाटील यांनी पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या कारभाराला कलंक लावण्याचा ठेका घेतला आहे का? असा प्रश्न निर्माण होत आहे. राज रोज वाळू माफियांना पोसून राक्षसभुवन इतर चकलांबा पोलीस ठाणे हद्दीत केनी, जेसीबीच्या सहाय्याने वाळू उत्खनन करून त्याची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. या याची माहिती असतानाही जाणून बूजून पो.नि.संदीप पाटील शासनाची संपत्ती चोरीला जात असताना दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी या गंभीर बाबीची दखल घेऊन पो.नि.संदीप पाटीलवर कारवाई करावी. त्याच बरोबर वाळू पट्ट्यात संध्याकाळी फिरणारे पोलीस कर्मचारी कोण याची माहिती घेऊन त्यांना निलंबित करावे. एवढेच नव्हे तर पो.नि.संदीप पाटलांचा मोबाईलची तपासणी करावी म्हणजे दुधाचे दुध आणि दुधाचे पाणी होईल. पो.नि.संदीप पाटील यांचा कारभार म्हणजे मी नाही त्यातली अन् ... या म्हणीप्रमाणे आहे की काय? असे दिसून येते. त्यामुळे पो.नि.संदीप पाटील वाळू माफियांना पोसण्यापेक्षा कारवाई करून दाखवा अशी चर्चा होत आहे.

जिल्ह्यामध्ये पोलिस अधिक्षक नवनीत




कॉवत हे वेगवेगळ्या माध्यमातून पोलीस प्रशासनाचे नाव आणि शान उंचावत आहेत. समाजामध्ये पोलीस प्रशासनाचा जो सन्मान आहे तो अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनावरील उडत चाललेला विश्वास साबूत ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र दुसरीकडे पो.नि.संदीप पाटील हे वाळू माफियाला आशीर्वाद देऊन पोसण्याचे काम करत आहेत. पो.नि.संदीप पाटीलच्या नाका समोर वाळू माफिया अवैधरित्या वाळू उत्खनन करून अवैध वाळू वाहतूक करत आहेत. यामुळे पोलीस अधिक्षक यांच्या चांगल्या कारभाराला कलंक लावण्याचा प्रयत्न पो.नि.संदीप पाटील करत असल्याची चर्चा होत आहे. पो.नि.संदीप पाटील वाळू माफियांवर कारवाई करण्याची हिंमत नाही का? जिल्ह्यात पोलीस प्रशासनाची इज्जत घालवू नका. वाळू माफियांना आशीर्वाद देऊ नका . माध्यमाच्या अनेक प्रतिनिधींना पो.नि.संदीप पाटील कशा पद्धतीने वागणूक देत आहेत हे अनेक प्रकरणावरून दिसून येत आहे. मात्र याच पो.नि.संदीप पाटीलचे अनेक कर्मचारी वाळू पट्ट्या रात्री अपरात्री काय करतात याची बारीक आणि गुप्त पद्धतीने पोलीस अधिक्षकांनी माहिती घ्यावी. त्याच बरोबर वाळू पट्ट्यात फिरणाऱ्या या पोलीस कर्मचाऱ्यांनी अपाल्या वरिष्ठांना फोन लावला. कशाची माहिती दिली. रोज रात्री अवैध उत्खनन सुरू असताना पो.नि.पाटील यांचा मोबाईल नॉट रिचेबल का असतो. का कारवाई करण्यासाठी पुढे येत नाहीत. त्यामुळे कोठेतरी कारवाईला पो.नि.संदीप पाटील जात नसल्यामुळेच वाळू माफियांना आशीर्वाद मिळत आहे का ? असा सवाल उपस्थित होत आहे. त्यामुळे पो.नि.पाटील यांनी या गंभीर बाबीची नोंद घेऊन पोलिस अधिक्षकांच्या चांगल्या कारभाराला कलंक न लावता वाळू माफियावर कारवाई करून वाळू पट्ट्यात फिरणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव कळवावे अशी चर्चा होत आहे.

# ९१ हजार गुटखा जप्त प्रकरणी परळी शहर पोलीसांची अजब कारवाई

## मुख्य गुटखा माफिया कारवाई केल्यानंतर कोठे होता? पोलीस अधिक्षक साहेब,शहर पोलीस ठाण्याचे सीसीटीव्ही तपासा

बीड (सरकार): परळी पोलीस स्टेशनचा कारभार अजब असल्याचे दिसून येत आहे. परळी शहरातील मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला अवैधरित्या गुटखा विक्री होत असल्याचे कळाल्यानंतर परळी शहर पोलीसांनी छापा मारून कारवाई करून एकूण मुद्देमाल ९१८०५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त केल्यानंतर गुटखा विक्री करणाऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतले. त्याच्याकडूनकोणाकडून गुटखा घेतला याची माहिती घेतली पण कारवाई केली नाही . त्या दिवशी मुद्देमाल जप्त केल्यानंतर शहर पोलीसात कोण आले, कोण गेले? याचे पोलीस अधिक्षकांनी सीसीटीव्ही तपासावे आणि या संदर्भात चौकशी करावी अशी चर्चा होत आहे.


शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा राजरोजपणे परळी शहर पोलीसाच्या हद्दीत विक्री होत आहे. याची माहिती परळी शहर पोलीसांना कळाल्यानंतर त्या ठिकाणी जाऊन कारवाई केली. पानटपरीमध्ये गुटखा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्यात आली. कोणाकडून गुटखा घेतला याचेही नाव समोर आले. आणि यामध्ये तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र या अगोदर गुटखा विक्री आणि गुटखा पुरवठा केला म्हणून यामध्ये या अगोदर गुन्हे दाखल झाले आहेत की नाही याची माहिती पोलीसांनी नाही म्हणून टाकली अहे. त्याच बरोबर ज्या दिवशी ही कारवाई केली त्या दिवशी परळी शहर पोलीस ठाण्यात कोण आले होते? कोण गेले हाते. काय झाले याची सर्व माहिती पोलीस अधिक्षकांनी कोणालाही न विचारता परळी शहर पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही तपासावे आणि चौकशी करावी अशी चर्चा होत आहे. मात्र पोलीस अधिक्षकांनी या बाबीची गंभीर नोंद घ्यावी की यातील मुख्य आरोपी या अगोदर कोणत्या गुन्ह्यात होता की नव्हता. पोलीसांनी टाकलेली प्रेस नोटमधील माहिती खरी आहे की नाही याची खातरजमा करावी आणि सदरील गुटखा विक्री साठा पुरवठा करणाऱ्यावर थेट स्थानिक गुन्हे शाखेकडून कारवाई करावी जेणे करून मुख्य गुटखा साठा माफिया आणि पुरवठा धारक आणि विक्री करणाऱ्यावर थेट कारवाई होईल अशी चर्चा होत आहे.

# शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी बँकेकडून होणाऱ्या अडवणुकी विरोधात शिवसेनेने घेतली बँकेची शाळा

## जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली बँकेची कान उघडणी

बीड (सरकार): सध्या सुरु असलेल्या खरीप हंगामात शेतकऱ्यांस आर्थिक अडचण निर्माण होत आहे. एक रुपयात पीक विमा ही योजना शासनाने गुंडाळली. तर नवीन पीक विम्या साठी शेतकऱ्यांना बँकानी प्रचंड नियम व अटी लादल्या आहेत. बँके कडुन शेतकऱ्यांचे सिबिल तपासले जात आहे. या विरोधात शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे व विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे यांच्या शेतकरी हिताच्या संकल्पने नुसार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी भारतीय स्टेट बँकेच्या मुख्य शाखेत जाऊन अधिकाऱ्यांची शाळा घेऊन कानउघडणी केली.

शिवसेना प्रदोत सुनिलजी प्रभू, प्रवक्त्या सुषमाताई अंधारे व संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव यांच्या आदेशानुसार आज शिवसैनीकांनी आपला मोर्चा बँके कडे वळवला. पीक



कर्जासाठी आलेले अर्ज किती? मंजूर अर्ज किती? नामंजूर अर्ज किती? प्रलंबित अर्ज किती व प्रलंबाचे कारण काय? पीक कर्जाचे उद्धीष्ट किती? शेतकऱ्यांना सिबिल चे कारण सांगून किती शेतकऱ्यांचा अर्ज नामंजूर केला? या सह असंख्य प्रश्न उपस्थित करून शिवसैनिकांनी बँक अधिकाऱ्यांची शाळा घेतली. यावेळी महिला जिल्हा संघटक मीरा ताई नवले, जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महुवाले, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,कामगार सेना रवी वाघमारे,नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे,सतीशसिंह परदेशी, गणेश लोणकर, मच्छिंद्र काळे, सतीश मस्के, नंदकुमार घोगरे,शेख मुजमिल,रमेश नवले,विशाल तांबे व इतर शिवसैनिक उपस्थित होते.



बीड संत मुक्ताबाई पालखीचे बीड शहरात काल आगमन झाल्यानंतर माळीवेस येथे मुक्काम करून पालखी आज धोडिपुरा मार्गे बलभीम चौक, बालाजी मंदिर येथे आजचा पालखीचा मुक्काम आहे (छाया कृष्णा शिंदे)

# हिंदी सक्तीच्या भूमिकेवरून साहित्यिक एकवटले; लेखक, कवी महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार परत करणार

मुंबई (सरकार): राज्यातील नव्या शैक्षणिक धोरणात पहिलीपासूनच्या वर्गातील मुलांना तिसरी भाषा शिकणे बंधनकारक केले आहे. त्यातच हिंदी भाषेशिवाय जर एखाद्याला अन्य भाषा शिकायची असेल तर २० विद्यार्थ्यांनी तशी मागणी करणे गरजेचे आहे अशी अट शासनाने घातली आहे. त्यातूनच अप्रत्यक्षपणे पहिलीपासून मुलांना हिंदी सक्तीने शिकावी लागणार आहे. राज्य शासनाने घेतलेल्या या भूमिकेचा सर्वच मराठी भाषा प्रेमींकडून विरोध होत आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी यावर आक्रमक भूमिका घेतली आहे. आता मराठी साहित्यिकही आपला आवाज बुलंद करत आहेत.

हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून लेखक, कवी हेमंत दिवटे यांनी महाराष्ट्र शासनाने दिलेला पुरस्कार परत करणार असल्याची घोषणा त्यांच्या सोशल मीडियावर केली आहे. हिंदी भाषेला तिसरी भाषा म्हणून लादण्याच्या निर्णयाचा निषेध म्हणून मला पॅरानोया ह्या कवितासंग्रहासाठी मिळालेला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार रकमेसकट परत करीत आहे. सरकारने निर्णय मागे घेतला तरच मी माझा निर्णय मागे घेईन असं त्यांनी जाहीर केले आहे. दिवटे यांच्या भूमिकेचे अनेकांनी कौतुक केले आहे. राज्य सरकारकडून हिंदी सक्ती केल्याने पालकांमध्येही नाराजी पसरली आहे.तर शासनाच्या पहिली पासून हिंदी भाषा तिसरी भाषा म्हणून अनिवार्य करण्याला विरोध आहे. सरकारने २० विद्यार्थी जमले तर पर्याय देऊन शब्दछळ केला. हिंदी भाषा शिकण्याला नाही तर मुलं थोडी मोठी झाली की ५ वी नंतर हिंदी शिकवा.

आमचा विरोध प्राथमिक शिक्षणात समावेशाला आहे. सरसकट हिंदी भाषेला नाही. कोवळ्या वयात मुलांना मराठी लिपी, व्याकरण याचा अदमास यायला पुरेसा वेळ मिळावा.

## संपादकीय

# हिंदी भाषेवरून वाद हे दुर्दैव!

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. केंद्रातील मोदी सरकारच्या काळात हा निर्णय घेण्यात आला. तसे पाहायला गेले, तर बाराव्या शतकापासून वारसा सांगणारी मराठी भाषा ही किती जुनी आहे, हे पटवून देण्यासाठी अनेक दाखले केंद्र सरकारला सादर करावे लागले. मराठी भाषा ही अभिजात झाली, पण आज महाराष्ट्रातील खेड्यापाड्यापासून शहरांपर्यंत मराठी जनांना मराठीचा किती भाषिक अभिमान आहे, याचे आता कुणी सर्वेक्षण केले, तर मराठी माणसेच व्यवहारात हिंदी भाषेचा अधिक वापर करत असल्याचे दिसून येईल. मुंबईसह मोठ्या शहरात बाजारात दुकानदाराशी बोलताना, रिक्षाचालक, टॅक्सी चालकाशी संवाद साधताना मराठीऐवजी हिंदीत बोलण्याचा कल असतो. आता या प्रवृत्तीला सरकार काय करणार? दोन व्यक्तींमधील संवाद हा मातृभाषेत असावा की, अन्य भाषेत असावा हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे; परंतु अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर, मराठीत बोला, अशी चळवळ कुठे उभी राहिल्याचे ऐकिवात नाही. मात्र, शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेवरून सध्या वाद सुरू झाला आहे तो दुर्दैवी आहे.

मराठीच्या मुद्द्यांवरून आग्रही असलेल्या मनसेने आता शालेय शिक्षणातील हिंदी भाषेवरून राजकीय वातावरण तापविण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत योग्य आहे?, खरंच शाळेतील अभ्यासक्रमात हिंदी भाषा असली, तर मराठीचा अपमान होणार आहे का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, याचा समस्त मराठी जनांनी विचार करायला हवा.

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या निर्णयाला मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी कडाडून विरोध केला आहे. उत्तरेतील लोकांना सुसंस्कृत महाराष्ट्र काबीज करायचा आहे. त्यासाठी आयएएस अधिकाऱ्यांच्या लॉबीकडून महाराष्ट्रात हिंदीची सक्ती करण्यासाठी दबाव आणला जात आहे, असा आरोप मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केला आहे. या आरोपामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मराठी-हिंदी असा भाषेचा नव्याने वाद सुरू झाला आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेली भूमिका महत्त्वाची आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदीला मान्यता दिली म्हणजे मराठीचा अपमान होतो, असा प्रचार करणे चुकीचे आहे. त्रि भाषेचे सूत्र नवीन शैक्षणिक धोरणात आहे, त्यामध्ये मातृभाषा अनिवार्य असून त्या व्यतिरिक्त दोन भाषा असून त्यातील एक भारतीय भाषा असली पाहिजे, असे नमूद केले आहे. आधी महाराष्ट्र सरकारने हिंदी भाषा अनिवार्य केली होती. मात्र, जीआर काढून त्यातील अनिवार्यता हा शब्द काढून टाकलेला आहे. कुठलीही तिसरी भारतीय भाषा विद्यार्थ्यांना शिकता येईल. त्यात हिंदी भाषेचा समावेश आहे, स्वाभाविकपणे लोक आपल्याकडे इंग्रजी स्वीकारतात, त्यामुळे कुठलीही तिसरी भारतीय भाषा शिकणे गरजेचे आहे, असे स्पष्टीकरण देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आता एकच गोष्ट आपल्या सगळ्यांना माहीत आहे की, इंग्रजी ही जगाची भाषा मानून सर्वत्र तिचा आपण पुरस्कार केला आहे. इंग्रजी ही व्यवहारभाषा असल्यामुळे त्याचे कौतुक करायला हरकत नाही; परंतु भारतीय भाषांचा तिरस्कार करणे योग्य आहे का ? भावनिक साद घालणाऱ्या भारतीय भाषा या इंग्रजीपेक्षा चांगल्या आहेत, याचा विचार आपण करणार आहोत की नाही?. नवीन शैक्षणिक धोरणाने सर्वात महत्त्वाचे काम जे केले ते म्हणजे मराठीला ज्ञानाभाषा बनवण्याचा मार्ग खुला केला आहे. महाराष्ट्रात आपण इंजिनिअरिंग (अभियांत्रिकी) हे मराठीत शिकवायला लागलो आहोत, जे यापूर्वी कधीच घडले नव्हते. नवीन शैक्षणिक धोरणामुळे वैद्यकीय क्षेत्रात आपले डॉक्टर तयार होणार आहे, ते मराठीत शिक्षण घेऊ शकतात. एवढंच नव्हे तर एमबीएचे शिक्षणदेखील मराठीत शिकता येईल, असे दालन राज्य सरकारकडून उघडले असेल, तर मराठी भाषेबद्दल राज्य सरकारला आदर राहिलेला नाही, असा युक्तीवाद जर कोणी करत असेल, तर तो मुर्खपणा समजायला हवा.

मराठी भाषा, मराठी साहित्याबाबत नव्या पिढीला सजग करणे हे जितकी सरकारची जबाबदारी आहे त्यापेक्षा मराठी पालकांची आहे. घराच्या चार भिंतीत मराठी बोलून चालणार नाही, तर प्रत्येक मराठी माणसांने संवादासाठी जास्तीत जास्त मराठी भाषेचा वापर करायला हवा. चीन, जपान या देशात त्यांच्या स्थानिक भाषांना महत्त्व दिले जाते.

देशाबाहेर कशाला? जरा दक्षिणेत भ्रमंती करून आलेल्या माणसांना विचारा, त्या-त्या राज्याची भाषा ही किती मोठी आहे याची कल्पना येते. त्याठिकाणी प्रादेशिक भाषेचा वापर केला जातो. मुंबई, महाराष्ट्रात मराठी माणसाने हिंदी भाषेला आधीच मावशीचा दर्जा देऊन ठेवला आहे, तर मग आता हिंदीचा तिरस्कार करणे कितपत योग्य आहे. मुंबईत उत्तर भारतीयांची गेल्या तीन दशकांत वाढलेली लोकसंख्या पाहता, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदी भाषिक होईल असे विधीमंडळात दबक्या आवाजात कॉंग्रेस सरकारच्या काळातही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून निवडून आलेले लोकप्रतिनिधींकडून दबक्या आवाजात बोलले जात असे. हा ९० च्या दशकातील किस्सा असला तरी, आज २०२५ साल उजडल्यानंतर, आपण काय शिकलो याचा विचार प्रत्येक मराठी माणसाने करायला हवा. फेरीवाल्यांपासून, लॉन्ड्रीचे कपडे देण्यासाठी आपल्याला उत्तर भारतीय लागतो. कारण मराठी माणसांना अंगमेहनतीचे काम करणे हे कमीपणाचे वाटते. एक उदाहरण म्हणून पाहिले, तर एका कॉलनीतील मराठी कुटुंबीयांनी त्यांची कामे उत्तर भारतीय व्यक्तीकडून करून घेण्यास हरकत नाही. पण, त्याची व्यवहारीक बोलताना मराठीचा हट्ट धरला तरी, तो उत्तर भारतीय मराठी भाषा नक्कीच शिकेल, असा विश्वास मानायला हरकत नाही. शालेय शिक्षणातील हिंदीवरून वाद करण्यापेक्षा महाराष्ट्रात राहणाऱ्या अमराठी व्यक्तींना मराठी बोलण्यास जरी आपण भाग पाडले तरी, हिंदीचा अवमान होणार नाही. मराठीचा अभिमान असल्याचे दाखवण्याची संधी प्रत्येकाला मिळू शकते.

# अरण्यातले वनऋषी



ज्येष्ठ साहित्यिक आणि अरण्यऋषी असे ज्यांना आदराने नाव दिलेले होते असे मारूती चितमपल्ली यांना वयाच्या ९३ व्या वर्षी देवाज्ञा झाली. ९३ वर्षे हे काही लहान-सहान आयुष्य नव्हे. पण त्या आयुष्यात हा माणूस पक्षी आणि प्राण्यांचा मित्र होता आणि त्यांचा अभ्यासक होता. त्यासाठी त्यांनी वनक्षेत्रपाल नोकरी करत असताना आपले आयुष्य या आपल्या मुक्या मित्रांसाठी वेचले आणि लोकांना प्राणी आणि पक्ष्यांची महती सांगितली. नुसती सांगितलीच नव्हे तर लोकांमध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून काम केले. त्यांना अरण्यऋषी म्हटले गेले. पण ते खरोखरच अरण्यातील तपस्वी होते आणि त्यांनी या आपल्या मुक्या मित्रांसाठी आयुष्यभर खूप काही केले आणि त्यांचा अभ्यास केला. चितमपल्ली यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि त्यांचे 'चकवाचांदण' असो किंवा 'नवेगाव बांधचे दिवस' असो, जंगलातील एक विलक्षण अनुभूती देते. चितमपल्ली यांनी लौकिकार्थाने वानिकी विद्या शिकून सरकारी नोकरी केली आणि अखेरपर्यंत ते वन्य जीवांसाठी जगले. सोलापूर येथे जन्मलेले चितमपल्ली यांनी आपले उर्वरित जीवन विदर्भात घालवले आणि विदर्भातील जंगलांत त्यांनी आयुष्यातली उमेदीची वर्षे घालवली. त्यांनी केवळ वन खात्यात नोकरी केली नाही, तर संस्कृत पाठशाळेत अध्ययनही केले आणि जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यासही केला. पण त्यांचे जीवन वनाधिकारी म्हणून कार्य करण्यासाठी वेचले आणि त्यात त्यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायचे कसे हे शिकवले.

कर्नाळा पक्षी अभयारण्य, मेळघाट प्रकल्प आणि नवेगाव येथील प्रकल्पांच्या विकासात त्यांचे योगदान आहे. पण त्यांची ओळख आहे ती म्हणजे निसर्ग आणि पर्यावरणाशी नाळ जोडलेला माणूस म्हणून आणि हीच त्यांची ओळख शेवटपर्यंत कायम होती. चितमपल्ली यांच्या आईने त्यांना प्रथम जंगलावर प्रेम करायला शिकवले. १९६० मध्ये महाराष्ट्रात त्यांची वनाधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील जंगलाचा अभ्यास केला आणि इतरांनाही शिकवला. त्यांचे पहिले वनाधिकारी म्हणून दशक कोकणात गेले, ज्यावेळी तेथे कोणतेही राष्ट्रीय उद्यान अथवा अभयारण्य नव्हते. पण त्यांचा अभ्यास आणि निसर्गाचे वाचन खरे सुरू झाले ते नवेगाव येथे नियुक्ती झाल्यावर आणि तेथील माधवराव पाटील यांना भेटल्यावर. त्यांनी साहित्यात ही सारी पात्रे अजरामर केली आहेत. माधवराव पाटील हे तर साधे शिकारी होते. पण त्यांना या अरण्यऋषीचा सहवास घडला आणि ते जंगलाचे अभ्यासक बनले. महाराष्ट्रातील रहिवाशांमध्ये जंगले लोकप्रिय करण्याचे श्रेय निःसंशय चितमपल्ली यांच्याकडेच जाते. कारण त्यांच्यामुळेच आज लोक जंगलाकडे वळले आहेत आणि लोकांत जंगले पाहण्याची आवड निर्माण झाली आहे. साहित्यिक म्हणून त्यांचे श्रेय प्रचंड आहे आणि त्याचे पहिले पुस्तक 'पक्षी जाय दिगंतरा.' हे आले तेव्हा ते बेस्ट सेलर ठरले. तेव्हा हा कोण नवीन लेखक आला आहे असा प्रश्न मान्यवर साहित्यिकांना पडला होता. नंतर चितमपल्ली हे सर्वपरिचित झाले आणि ते महाराष्ट्रात लोकप्रिय लेखक बनले. त्यांच्या पुस्तकांनी नवीन शैली सुरू केली आणि नवीन लेखकांना प्रोत्साहन दिले असे तज्ज्ञांचे मत आहे. हा माणूस कायम जंगलात वास्तव्याला असायचा आणि त्यामुळे त्यांचे जीवन जंगलातील हवेने, तेथील ताज्या घटनांनी समृद्ध झालेले होते आणि त्यांच्या नियमित परिघाला समृद्ध करणारा अनुभव देणारा लेखक जन्माला आला होता. साहित्यिक या दृष्टीने चितमपल्ली यांचे जीवन, लेखन आणि अनुभव हे इंग्रजी लेखकाच्या जवळ जातात. कित्येक नामवंत लेखक असे आहेत की, त्यांनी आपल्या लेखनासाठी चाकोरीतील आयुष्य सोडले आहे आणि नवीन आयुष्य सुरू केले. चितमपल्ली त्यातच गणले जातात. त्यांनी आयुष्यभर जंगलातील माणूस म्हणून जगण्यात समाधान मानले आणि तरीही त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही. चितमपल्ली यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायला शिकवले असे जे म्हटले ते या अर्थाने. ते कित्येक वेळा पक्ष्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास करत असत आणि त्यांच्या नोट्स घेत असत. त्यातून त्यांची अनेक पुस्तके जन्माला आली. चितमपल्ली हे सरकारी नोकरी करत राहून व्रतस्थ होते आणि त्यांनी पक्षी कोश लिहिला तेव्हा त्यात ४०० हून अधिक पक्ष्यांचा त्याच्या स्थलांतराचा अभ्यास त्यात आहे. त्यांची एक खंत होती ती म्हणजे आजचे वनपाल पुरेसे निरीक्षण करत नाहीत आणि नोंदी घेत नाहीत. कित्येक वनपाल तर केवळ टाकणे याच एका हिशोबात काम करत असतात. अर्थात चितमपल्ली यांना जे पाहिजे होते ते आज कुणीही करणे शक्य नाही. कारण आज जो तो पगार आणि आपण इतकेच पाहत असतो. त्यामुळे चितमपल्ली खंत घेऊन गेले हे त्यांचे प्रारब्धच होते. महाराष्ट्रातील जंगलात ३६ वर्षे वास्तव्य करून अत्यंत समृद्ध अनुभव गाठीशी बांधून चितमपल्ली आज आपल्यात नाहीत. चितमपल्ली यानी केवळ जंगलावर पुस्तके लिहिली आहेत आणि त्यात 'रानवाटा' जसे आहे तसेच 'रातवा' आणि कितीतरी आहेत.


सोलापूरमध्ये झालेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तरुणालाही लाजवेल अशा पद्धतीने आणि तडफेने काम करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्यांनी 'पक्षी कोश' लिहिला तसेच 'वृक्ष कोश' लिहिण्याचे त्यांचे काम अर्धवट राहिले. अरण्य वाचन आणि सतत कार्यरत राहणारा ऊर्जावान असा हा लेखक होता. पण आज त्यांचा जीवनप्रवास काळाने संपवला आहे. त्यासाठी लागणारी माहिती मिळवण्यासाठी वाट्टेल ते कष्ट करण्याची तयारी त्यांची होती. त्यामुळे 'पक्षी कोश' त्यांच्याकडून लिहून झाला. त्यांच्या पुस्तकात प्राणी जीवनाबद्दल मनोरंजक माहिती आहे. चितमपल्ली यांच्या मते अनेक वृक्ष पावसाचे संकेत देतात. बिब्याच्या झाडाला फुले लागली, तर त्या भागात दुष्काळ पडतो असे त्यांचे निरीक्षण होते. असे अनेक मनोरंजक, निरीक्षण आणि ज्ञान त्यांच्या लेखनात होते. चितमपल्ली यांना भावपूर्ण श्रद्धांजली. चितमपल्ली यांच्यासारखे लोक आता होणार नाहीत. हा ठेवा आहे. तो काळाने न मागता आपल्याला दिला होता आणि न सांगता नेलाही.

# घरबसल्या पैसे कमवायचे असतील तर हे अल्पकालीन कोर्सेस शिकून करिअर करा

आजकाल महिलांसाठी कंटेंट रायटिंग, सोशल मीडिया मॅनेजमेंट असे अनेक कोर्सेस उपलब्ध आहेत, ज्यांच्या मदतीने त्या घरी बसून पैसे कमवू शकतात. आजच्या डिजिटल युगात, महिला घरी बसून नवीन कौशल्ये शिकून स्वावलंबी होत आहेत. कंटेंट रायटिंग, सोशल मीडिया मॅनेजमेंट, ईमेल मार्केटिंग सारखे कोर्सेस शिकणे सोपे नाही तर ऑनलाइन पैसे कमविण्यासाठी देखील वापरले जाऊ शकतात.चला त्यांच्याबद्दल जाणून घेऊया-

**ईमेल मार्केटिंग समन्वयक :** यामध्ये, ग्राहकांना ईमेल पाठवून व्यवसायाचा प्रचार करावा लागतो. यामध्ये, ईमेल यादी तयार करणे, सुंदर ईमेल डिझाइन करणे आणि ते पाठवण्याची योग्य वेळ ठरवणे शिकवले जाते. साधनांच्या मदतीने, हे काम घरबसल्या करता येते. महिला ही कौशल्ये ऑनलाइन किंवा कोणत्याही संस्थेतून शिकू शकतात आणि ई-कॉमर्स, शिक्षण आणि सेवा उद्योगात क्लायंटसाठी काम करू शकतात.

**सोशल मीडिया मॅनेजर :** जर एखाद्याला फेसबुक, इंस्टाग्राम किंवा ट्विटर सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर काम करण्याचा अनुभव असेल, तर ती घरबसल्या सोशल मीडिया मॅनेजर बनू शकते. यामध्ये पोस्ट तयार करणे, कॅप्शन आणि रील्स तयार करणे, पेज वाढवणे यांचा समावेश आहे. यासाठी कॅनव्हा, बफर सारख्या टूल्सची मदत घेतली जाऊ शकते. अनेक स्टार्टअप्स आणि छोटे व्यवसाय फ्रीलान्स सोशल मीडिया मॅनेजर



नियुक्त करतात.

**डिजिटल मार्केटिंग तज्ञ :** यामध्ये डएज, सोशल मीडिया, ईमेल, कंटेंट आणि जाहिरातींचे संपूर्ण ज्ञान समाविष्ट आहे. महिला Google, Skillshop, Coursera वरून व्यावसायिक डिजिटल मार्केटिंग अभ्यासक्रम करू शकतात. एकदा प्रमाणित झाल्यानंतर, महिला क्लायंटकडून फ्रीलांस प्रोजेक्ट घेऊ शकतात आणि घरून काम करू शकतात. जर त्यांना हवे असेल तर त्या त्यांच्या स्वतःच्या सेवा किंवा उत्पादनाची ऑनलाइन जाहिरात देखील करू शकतात. कंटेंट रायटिंगमध्ये, तुम्ही ब्लॉग, वेबसाइट, सोशल मीडिया पोस्ट आणि उत्पादन वर्णनांसाठी लेख लिहू शकता. यामध्ये, महिला घरी बसून कोर्सेरा आणि गुगल सारख्या वेबसाइटवरून ऑनलाइन कोर्स करू शकतात.

# जुलैमध्ये शुक्र ३ वेळा करणार राशी परिवर्तन

ज्योतिषशास्त्रात जेव्हा एखाद्या ग्रहाचे गोचर होते. तेव्हा त्याचा परिणाम सरळ आपल्या जीवनावर होतो. त्याच पद्धतीने शुक्रचे गोचरही महत्त्वाचे असते. खरंतर, जुलै महिन्यात शुक्र तीन वेळा चाल बदलणार आहेत.

शुक्र ८ जुलैला दुपारी ४.३१ मिनिटांनी रोहिणी नक्षत्रात प्रवेश करणार आहेत. त्यानंतर २० जुलैला दुपारी १.०२ मिनिटांनी मृग नक्षत्रात प्रवेश करणार आहेत. त्यानंतर महिन्याच्या अखेरीस २६ जुलैला सकाळी ९.०२ मिनिटांनी मिथुन राशीत प्रवेश आहेत. शुक्रला सुख-समृद्धी, दौलतचे कारक मानले जाते. असे मानले जाते की ज्याच्यावर शुक्राची कृपा राहते त्या व्यक्तीवर लक्ष्मी मातेचा आशीर्वाद राहतो.



**सिंह :** जुलैमध्ये शुक्रचे गोचर सिंह राशीच्या लोकांसाठी काही गुड न्यूज मिळू शकते. घरातील तणाव संपू शकतात. आरोग्य चांग राहील. सोबतच प्रत्येक कामात मिळेल. सिंह राशीच्या ल कुटुंबियांशी संबंध मजबूत होतील. नोकरीच्या शोधात आहेत त्यांना नोकरी मिळेल. पैशाशी संबंधित समस्या संपतील.

**तूळ** : शुक्रचे ३ वेळा चाल बदलणे तूळ राशीच्या लोकांसाठी चांगले मानले जात आहे. यामुळे मानसिक ताणातून सुटका मिळेल. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांची साथ लाभेल. नोकरी करणाऱ्या लोकांची पगारवाढ होऊ शकते.

**धनू :** शुक्रच्या बदलत्या चालीमुळे धनू राशीच्या लोकांना बिझनेसमध्ये फायदा होईल. जीवनात अनेक आनंदाच्या बातम्या मिळतील. फायनान्सची स्थिती चांगली राहील. शेअर मार्केटमधून लाभ होऊ शकतात.

# मंत्र वारीचा

**मंत्र वारीचा संतांच्या पायधूळीतून**
**भिजतो मातीचा जीव...**
**शब्दांच्या ओवाळणीतून गुंफतो**
**भावाचा पीस।**
**पंढरीच्या वाटेवरती घामाचे**
**मोती चमकती...**
**नामाच्या गजरात उरते भक्तीची**
**अमोल रत्ने।**
**वाऱ्याच्या तालावरती फडकते**
**झेंडा साक्षीला...**
**तुकोबाच्या ओवीतून मुक्तीचा**
**अर्थ उमलतो।**

बाहेर भुरभुरणारा पाऊस मनात कुठेतरी हुरहूर माजवत होता म्हणूनच असेल कदाचित वारीची ओढ लागलेल्या माझ्या लेखणीतून हे शब्द उमटले. खरोखरच भक्ताचे भाव पावसाच्या सरींसारखे बरसतात तिथे जिथे तेथे आनंद आहे, वेदना आहे आणि विठ्ठल भेटीचा अनंत सोहळा आहे अशा त्या वारीची ओढ मनाला लागली तर नवल ते काय? कस आहे ना की समर्पणाचा अंतिम क्षण पंढरीच्या वारीत आपले देहभान हरवते. तेथे केवळ भक्ती आणि आत्मशोध उरतो आणि उरते ती अव्यक्त वेदना आणि निर्मळ समाधान आहे. वेदनेची शाश्वत लहर आहे ती किंवा सहजतेचा नितळ प्रवाह म्हणा हवतर. वारी म्हणजे नक्की काय? तर वारी म्हणजे अखंड प्रवास, अखंड भक्ती आणि अखंड प्रेम की जे असते विश्वाच्या अस्तित्वाच्या उत्सवावर, वारी असते सतत वाहणाऱ्या भक्तिरसाचा शाश्वत सोहळा अखंड अविरत सुदाम्याच्या पोह्यांसारखा आयुष्यभर पुरणारा. वारी असते ती गोंदण वाट की जी आत्म्याची ओढ देहाच्या साजावर विसंबून, भक्ताच्या अंतःकरणात उमटणारी विठ्ठल भेटीची आस. वारी असते आत्मशोधाची अशी वारकऱ्यांचा देह चालतो, पण ओढ आत उरते ती केवळ विठ्ठल भेटीची. वारकऱ्याचे पाऊले भक्तिरसात नाहून निघते. ती वाऱ्यावर हलती ओढ अंतरीचा तो साज, विसरतो देहभान. विठ्ठल नामाच्या सुरात ओठ अलवार होतात आणि धुक्यात हरवते वारी मग आभाळ ही भरून येते आणि भिजलेल्या मनाने भक्ती रस्तोरस्ती सांडते. अगदी खरं सांगायचं, तर वारी ही केवळ चाल नाही, ती अंतःकरणाची भाषा आहे.

विठ्ठल नामाच्या संगतीच्या आर्त जपात, हरवत चालणारा ती भक्ती ओढ, समर्पण आणि अनंत शरणागत या वाटेवर मिळणारा शुद्धतेचा साक्षात्कार असतो. वारी असतो एका प्रवासाचा मंत्र किंवा उषःकालच्या धूसर प्रकाशात पंढरीच्या दिशेने वाहणारा ओघ. हे चालणारे पाय केवळ पंढरीच्या वाटेवरून जात नाहीत, तर आपल्या मनाच्या गाभ्यातील अंधाऱ्या कोपऱ्यांमध्येही उजेडाचा साक्षात्कार घडवतात. धुळकट रस्त्यावर उमटणाऱ्या पाऊलखुणा म्हणजे श्रद्धेचा ठसा असतो. प्रत्येक पाऊल पुढे पडते ते एका वेगळ्या विश्वाच्या शोधात पडत. ओव्यांनी भारलेला हा प्रवास थकवा विसरायला लावतो आणि अंतरी भाव दाटतो तो विठुरायाच्या भेटीच्या आर्ततेचा आणि मग शब्दांच्या मागे धावणारे मन एका अनाम प्रेमाच्या झंझावातात गुंतून जाते.

त्या निळ्या आकाशाखाली वारकऱ्यांच्या टाळ मृदुंगाच्या ठेक्यात कधीतरी कराल काळही हरवतो. आवाजांची लय, चालण्याचा ताल आणि हृदयाच्या स्पंदनांची एकसंध लहर, हीच खरी मुक्ती आहे याची पदोपदी जाणीव होते.



हा प्रवास आहे अंत:करणाचा, जिथे जन्म मृत्युच्या सीमा देखील लोप पावतात आणि उरतो तो फक्त विठू नामाचा गजर.वारी म्हणजे केवळ चालणारा प्रवास नव्हे, तर आत्म्याचे शुद्धीकरण आणि ब्रह्मतत्त्वाच्या अनुभूतीचा मार्ग आहे. संत ज्ञानेश्वरांनी या वाटेवर अद्वैताची अनुभूती दिली, जिथे देहाचे अस्तित्व विसरून आत्मा विश्वात विलीन होतो.धिटुकली मुक्ताई भक्तीचा स्वर स्वच्छंदतेने गोंधळत मुक्ततेचा मंत्र जपून गेली तर अशा या भावंडांचा वारकरी समुदायाशी असलेला नातेसंबंध हा केवळ श्रद्धेचा नव्हता, तर अंत:करणाच्या विलीनतेचा होता. जनाबाईंनी तर नामस्मरणाला कर्मयोगाचा स्पर्श दिला. त्यांच्या सेवेतील प्रत्येक स्पंदन हे ईश्वराशी संवाद होता, जिथे अहंकार लोप पावतो आणि भक्ती आत्म्याच्या स्वरूपात प्रकटते. तर तुकाराम महाराजांनी नामाचा गजर म्हणजे निर्भयतेचा ध्वजच उभारला. त्यांच्या ओव्यांमध्ये आत्मशुद्धीचा साक्षात्कार घडतो आणि वारी ही केवळ पंढरीची वाटच राहत नाही, तर अनादी परमात्म्याचा शोध देखील बनते. आता पहा ना पुंडलिकाच्या कृतीमधून एक नवा सत्याचा प्रकाश पडतो आणि सेवा म्हणजेच भक्ती आणि भक्ती म्हणजेच ईश्वराचा साक्षात्कार हा त्यांच्या विनयातून गवसतो, मग समर्पणाचे परम तत्त्व देखील त्यातूनच जाताच्या समोर येते कारण जिथे परमात्म्याचा स्वीकार मनापासून केलेला असतो.

वारी ही चालणाऱ्या पावलांची नव्हे, तर मनाच्या निवेदनाची वाट आहे. ही वाट श्रद्धेच्या दीपातून उजळते आणि भक्तीच्या लयीत विलीन होते. यात माणूस केवळ देह नसतो, तर एक सजीव मंत्र बनतो जो संतांच्या ओवीतून अनंतात विलीन होतो. म्हणूनच तर वारी म्हणजे केवळ चालणं नव्हे, तर जीवनाच्या प्रत्येक कडवट अनुभवाला गोड करण्याचा एक मार्ग. हे नुसते मूक पायपीट करणारे शरीर नव्हे, तर विचारांच्या गूढतेत हरवलेली माणसं. आणि पंढरीच्या वाटेवरील प्रत्येक पाऊल हा एक आत्मशोध, ज्यात संपूर्ण सृष्टीचा स्पर्श जाणवतो. अखेरीस इतकच म्हणेन की,

**धुळीच्या कानांनी ऐकला मंत्र...**
**पावलांच्या ठेक्यात मिळवला अंतर...**
**हृदयाच्या स्पंदनांत जागले गूज...**

## विशेष वृत्त

# परळीत पोलिसांनी जनसंवाद बैठक घेण्याची मागणी

**परळी :** परळी वैजनाथसारख्या सर्वांगाने महत्त्वपूर्ण असलेल्या शहरात गुन्हेगारी कमी करण्यासाठी तसेच शांतता प्रस्थापित करण्यासाठी नागरिक आणि पोलीस यांचा सुसंवाद असणे अत्यंत गरजेचे आहे. जिल्हा पोलीस अधिक्षकांनी परळीत लवकरच व्यापक जनसंवाद बैठक आयोजित करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पोलिस अधीक्षकांना निवेदन पाठवले आहे. निवेदनात म्हटले आहे की, परळी शहर हे अनेक अर्थाने म्हणजेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक आणि दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. येथील कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने अनेक प्रश्न नेहमीच उपस्थित केले जातात. अवैध धंदे, व्यसनाधीन होत चाललेले बालक आणि तरुण व त्यातून वाढत चाललेली गुन्हेगारी ही अतिशय गंभीर बाब आहे. या सर्व प्रश्नांशी आपल्याला अवगत होणे अत्यावश्यक बाब आहे. सर्वसामान्य नागरिक, महिला, मुली आणि विद्यार्थी यांना आपल्याशी मुक्त संवाद साधता यावा. तसेच परळीच्या व्यापारी बांधवात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना नष्ट व्हावी. श्रावण महिन्यात लाखो भाविक वैद्यनाथ प्रभूच्या दर्शनाला येत असतात, सुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांच्या काय सूचना आहेत त्याचे संकलन करणे तसेच त्यांना त्यांचे प्रश्न आपल्यासमोर मोकळेपणाने मांडता यावेत. यासाठी आपण परळी वैजनाथ येथे लवकरच एक मुक्त जनसंवाद बैठक आयोजित करावी अशी मागणी राजेभाऊ फड यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात योग दिन साजरा

**पाटोदा :** येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभागांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून रोजी जागतिक योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

योगदिनानिमित्त आयोजित योगप्रशिक्षण शिबिराच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आबासाहेब हांगे होते. याप्रसंगी उपस्थितांना योगप्रशिक्षक उद्धव लाड, योगप्रशिक्षक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी विविध योगासने व प्राणायाम प्रकारांचे प्रशिक्षण दिले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, क्रीडा विभागप्रमुख डॉ. विनोदचंद्र पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, कार्यालय अधीक्षक अशोक पवार यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. विनोदचंद्र पवार यांनी केले. आभार डॉ. सोमनाथ लांडगे यांनी मानले.

# संत एकनाथ महाराजांची पालखी आज रायमोहा येथे मुक्कामी

**बीड :** सुमारे ४२५ वर्षांची दीर्घ परंपरा असलेली श्रीक्षेत्र पैठण येथील शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांची मानाची पालखी आज दि. २३ जून रोजी मौजे रायमोह मुक्कामी येत आहे. पालखीचे दि. १८ जून रोजी श्रीक्षेत्र पैठण येथून प्रस्थान झाले आहे. प्रस्थानाच्या १९ दिवसाच्या पायी प्रवासनंतर नंतर ही पालखी दि. ५ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपुर येथे पोहचेल. विशेष बाब म्हणजे पंढरीच्या दिशेने, विठ्ठल भेटीची आतुरता असणाऱ्या वारकऱ्यांना घेऊन निघालेल्या संत एकनाथ महाराज पालखीचा प्रवास यंदा १२० किलो चांदीच्या रथातून पालखीचा प्रवास सुरु आहे. दरम्यान सोमवारी ५ वाजता पालखीचे रायमोह येथे आगमन होईल. रायमोहकर ग्रामस्थांनी सालाबादप्रमाणे याही वर्षी पालखीच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. श्रींच्या आरती नंतर परिसरातील भाविकांना नाथांचे दर्शन घेता येईल. त्यानंतर रात्री ९ वाजता जाहीर हरीकिर्तन होईल, नंतर रायमोहकर भजनीमंडळाचा हरीजागर होईल व मंगळवारी पहाटे ५.३० वाजता पालखीचे पुढील मुक्कामी प्रस्थान होणार आहे. दरम्यान धनगरवाडी, हटकरवाडी, गारमाथा, उंबरविहिरा, तांबाराजुरी मार्गे पालखी पाटोदा मुक्कामी जाते.

## वडवणी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**वडवणी:** भारतीय स्टेट बँक दिनानिमित्त वडवणी शाखेच्या वतीने दि. २४ जून रोजीरक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. याशिबिरामध्ये तालुक्यातील बँक ग्राहक, शेतकरी, नागरिक, कर्मचारी यांनी सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन शाखेचे व्यवस्थापक अंकुश जाधव यांनी केले आहे. प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही १ जुलै हा बँक दिन म्हणून सर्व भारतामध्ये उत्साहात साजरा करण्यात येत असतो. यानिमित्ताने देशभरात बँक प्रशासन व कर्मचाऱ्यांच्या वतीने विविध सामाजिक व आर्थिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया वडवणी येथे देखील प्रतिवर्षी बँक दिवस हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याचनिमित्ताने यावर्षीदेखील विविध उपक्रम राबवून बँक दिन साजरा करणार असुन बँक शाखेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## अवैध मुरुम वाहतूक करणारे चार हायवा पकडले

**बीड :** अवैधरित्या मुरुम वाहतूक करणारे चार हायवा बीड ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले. या हायवामधून मुरुमाची चोरटी वाहतूक व विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पाठलाग करून ही मोठी कारवाई केली. या कारवाईत साधारण एक ते दीड कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. ग्रामीण पोलीस ठाण्यात या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. बीड शहराजवळील एका पेट्रोल पंपाजवळ हायवामधून मुरुमाची वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. यावेळी पोलिसांना पाहताच हायवा चालकांनी तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला असता सपोन. बाळराजे दराडेंनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पाठलाग करून (क्र. एम.एच.१६ सीसी ७१३५), (एमएच २३ एयु. १७४१), (एम. एच. २३ एयु.२७८५) व (एमएच. २३ बीएल. ०१११) हे चार हायवासह चार चालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सय्यद पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, मोराळे, नामदेव सानप, चालक पवार, राठोड यांनी केली.

# आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने मुक्ताई पालखी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत!

### स्वागताची १९ वर्षाची परंपरा; पालखी सोहळा प्रमुख हरणे महाराज व मान्यवरांचा संघटनेच्यावतीने सत्कार





**बीड (प्रतिनिधी):–** श्रीक्षेत्र मुक्ताई नगर येथून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवलेल्या श्री संत मुक्ताई यांच्या पालखी सोहळ्याचे रविवार दि.२२ जून रोजी बीड शहरात आगमन झाले. यावेळी सुभाष रोड येथील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने या पालखी सोहळ्याचे ढोल–ताशा, फटाक्याची आतिषबाजी आणि वारकर्यांना आल्पोपहार देवून बीड शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने व अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर यांनी भव्यदिव्य स्वागत केले. श्री संत मुक्ताई यांच्या पालखीची महाआरती झाल्यानंतर पालखी सोहळा प्रमुख हरणे महाराज, सुधाकर महाराज, आचार्य अमृताश्रम महाराज व मान्यवरांचा संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

श्री संत मुक्ताई यांची पालखी गत ३१६ वे वर्षापासून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवते. गेल्या अनेक वर्षी पासून श्री संत मुक्ताईंची पालखी ही शहरात मुक्कामी असते. आज रविवार दि.२२ जून रोजी पालखी सोहळ्यातील वारकर्यांचे बीड शहरात आगमन झाले असता सुभाष रोडवरील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने भव्य दिव्य स्वागत केले. साठे चौक ते माळीवेस चौका पर्यंत मनमोहक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. दरवर्षी प्रमाणे आदर्श मार्केट व्यापारी संघटनेकडून वारकर्यांना आल्पोपहार दिला गेला. त्यानंतर पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प.हरणे महाराज व सुधाकर महाराज, रविंद्र पाटील, आचार्य अमृताश्रम महाराज, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, शहर पोलीस ठाण्याचे पी.एस.आय. कुमावत, पी.एस.आय.जाधव, पीएसआय वाळके, सानप, संपादक दिलीप खिस्ती, संपादक सुनील क्षीरसागर, व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोकराव शेटे, सचिव तुकाराम साळुंके, पत्रकार अनिल भंडारी, प्रा.लक्ष्मीकांत बाहेव्हाणकर, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, ॲड.संदीप बेदरे, मंगेश निटुरकर, प्रमोद जोशी, आनंद डोंगरे, आत्माराम वाव्हळ, कृष्णा शिंदे, यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्री संत मुक्ताईंच्या पादुकांची महाआरती करण्यात आली.

यावेळी आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर, सचिव सुदाम चव्हाण, उपाध्यक्ष महेबुब शेख, गणेश मुळे, महेंद्र दुग्गड, हनुमान पाचंग्रे, दगडु म्हेत्रे, डॉ. रमेश कैवाडे, राजु ताठे, राजेश कानगावकर, विशाल मानकुस, आप्पा औताडे, अरुण देवधरे, मच्छिंद्र उपरे, मंगेश काळे, देविदास नेरे, ओंकार उपरे, शुभम पाखरे, अमोल पतंगे, देवीदास मसुरे, निलेश पतंगे, राम शिंदे, विनायक पतंगे, दत्ता जगताप, शिवाजी शिंदे, ज्ञानेश्वर चव्हाण, हेंद्रे मामा, बाहेकर, दिपक पतंगे, मनोज पतंगे, गणेश उपरे, राहुल शिंदे, गणेश राऊत, ज्ञानेश्वर पंधारे, विनायक दुबाले, किरण वाघमारे, नारायण मानकुस, निलेश पतंगे, दत्ता उबे, बंटी कानगावकर, गणेश सुत्रे, देविदास मसुरे, लाला कानगावकर, आप्पा नरे, देविदास नेरे, दिपक घाडगे, अक्षय कानगावकर, कैलास उपरे, हरीभाऊ, सोमेश्वर कानगावकर, बप्पा घुगे, विनोद फटाले, राम मानकुस, गणेश राठोड, रवि वाघमारे, योगेश कानाडे, शुभम उपरे, सुग्रीव चव्हाण, यांच्यासह आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे सर्व पदाधिकारी, व्यापार्यांची उपस्थिती होती. सर्व व्यापारी बांधवांनी अल्पोपहार देवून वारकर्यांची सेवा करण्यासाठी बहुमोल परिश्रम घेतले.

# अंथरवनण पिंपरी आश्रम शाळेत योग दिन मोठ्या उत्साहात साजरा

**बीड (प्रतिनिधी):–** बीड पासून जवळच असलेल्या श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ संचलित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा तथा दीनानाथ बालकाश्रम अंथरवण पिंपरी तांडा ता.जि. बीड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य खंदारे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक शिंदे सर, पर्यवेक्षक जवरे सर ज्येष्ठ शिक्षक पैठणे सर हे होते. यावेळी सर्व विद्यार्थी शिक्षक उपस्थित पालक सर्व उत्साहीत होते. प्राध्यापक पवार एम.सी., जाधव एन.आर. यांनी उपस्थितांना योगाचे महत्व विशद करून सर्वांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. नियमित योगासने केल्यास आपण स्वतःला निरोगी ठेवू शकतो याची माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की, दररोज योगासने प्राणायाम केल्यास शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते. उपस्थितांचे आभार दातार सर यांनी मानले.



## छत्रपती शिवाजी विद्यालयात योगा वर्ग

**माजलगाव (प्रतिनिधी):** येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात जागतिक योग दिनानिमित्त योग वर्गाचे आयोजन करण्यात आले. या योग वर्गाला योगप्रशिक्षक प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर व प्रा. सुरेशचंद्र नेळगे यांनी मार्गदर्शन केले.

सुरुवातीला प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी योगासनांचा इतिहास सांगून त्याचे महत्त्व विशद केले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांकडून योगासनांची प्रात्यक्षिके करून घेतली. तसेच ध्यान, प्राणायाम देखील विद्यार्थ्यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, बालासाहेब झोडगे, आप्पासाहेब होके, विष्णू गडकर, माधव घोलप, मुरलीधर भाळशंकर, अनंत शेजुळ,

अनंत राठोड, दत्तात्रय इंगळे, सय्यद गयास, मिलिंद देशपांडे, सत्यप्रिया होके पाटील, फरजाना पठाण, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, शेख इशरत, मंजुषा गाजरे, तुळशीराम साळवे, पंकज कळसकर, ज्ञानेश्वर पवार, शेख शहाणूर, रवीकुमार साळवे, कैलास कदम, प्रथमेश लांडगे, दिनकर काळे, दत्ता पांडे यांच्यासह सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

बीड (प्रतिनिधी): श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमानेआंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम.कदम एस .डी, प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री.आर.टी. राऊत,राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीम. आर.डी. लोखंडे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम.एस.डी कदम, श्री.यू.व्ही.आगलावे, श्रीम.एम.एस.सोनवणे यांनी विद्यार्थिनीला योगाचे प्रकार व त्यांच्या जीवनात आरोग्यदायी महत्त्व विषद करून प्राणायाम,कपालभाती ,अनुलोम विलोम ,भ्रामरी प्राणायाम ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, अर्धचक्रासन, वज्रासन, शंशाकासन, मण्डुकासन, उष्ट्रासन, भुजंगासन, इत्यादी आसने घेण्यात आली. यावेळी शिक्षक, शिक्षिका , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# महिलांनी त्यांच्या हक्कासाठी लढले पाहिजेः पंडित

### गढी महाविद्यालयात महिला सबलीकरणावर राष्ट्रीय चर्चासत्र

**बीड (प्रतिनिधी):** क्रीडा, राजकीय सामाजिक शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात उत्तम रीतीने कामगिरी पार पाडण्यासाठी महिलांनी आपल्या हक्कासाठी लढले पाहिजे. पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये क्षमता जास्त आहे हे अनेक वेळा सिद्ध झालेले आहे. असे प्रतिपादन रणविर पंडित यांनी केले.

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथील गृहशास्त्र विभाग, लायब्ररी यांच्या संयुक्त

विद्यमाने महिला सबलीकरण संधी व आव्हाने या विषयावर एक दिवसीय आंतरविद्याशाखीय ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात रणवीर अमरसिंह पंडित, बोलत होते. तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे उपस्थित होते. या चर्चासत्रासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुनीता चांदोरकर, डॉ. गौरी कुलकर्णी पुणे या होत्या. यावेळी बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, महिलांना आज विविध क्षेत्रामध्ये संधी उपलब्ध आहेत. राजकीय क्षेत्रात विविध महत्त्वाच्या पदावर आज महिला असलेल्या आपण बघत आहोत. राजकीय क्षेत्रातील ३३ टक्के आरक्षणाच्या माध्यमातून महिलांनी जास्तीत जास्त संख्येने राजकीय क्षेत्रामध्ये सहभागी होऊन महिलांच्या सबलीकरणासाठी विविध निर्णय किंवा कायद्यांच्या माध्यमातून प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे सांगीतले. तर डॉ. सुनीता चांदोरकर यांनी महिलांच्या विविध क्षेत्रातील

सबलीकरणा विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. महिलांना, औद्योगिक, सामाजिक, राजकीय, कुटुंबिक, अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्य करत असताना येणाऱ्या अडचणी, समाजाचा महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांना दिली जाणारी वर्तणूक इत्यादी बाबीवर त्यांनी सविस्तरपणे प्रकाश टाकला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तबस्सुम इनामदार, प्रास्ताविक डॉ राणी जाधव, आभार डॉ. महारुद्र गव्हाणे यांनी मानले.

# पंढरपूरकडे निघालेल्या सायकल रायडर्सचे अंबाजोगाईत स्वागत

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** परभणी येथील प्रभावती डेली रायडर्स या सायकल ग्रुपच्या वतीने काढण्यात आलेल्या परभणी ते पंढरपूर सायकल वारीचे अंबाजोगाई शहरात आगमन होताच स्वागत करण्यात आले. शासनाच्या नवभारत साक्षरता या कार्यक्रमाअंतर्गत गटशिक्षणाधिकारी कार्यालय तसेच शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणच्या वतीने हे स्वागत करण्यात आले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, गोविंद खरटमोल, त्दत्ता देवकते, राम घोडके, संतोष कदम दीपक तळेकर, संदीप पवार, श्रीनिवास संगेवार, अंकुश हेडे, आकाश कऱ्हाड, सय्यद अमजद उपस्थित होते. प्रास्तविकात विजय रापतवार यांनी हा कार्यक्रम आयोजित करण्यामागची कल्पना विषद केली. गटशिक्षण कार्यालयाच्या वतीने सुवर्णकार यांनी नवभारत साक्षरता अभियाना अंतर्गत सर्व सायकल स्वारांनी या सायकलवारीत येणाऱ्या गावागावात साक्षरते विषयी जनजागृती निर्माण करावी असे आवाहन केले. राम घोडके, दत्ता देवकते, संतोष कदम यांनी समायोजित मनोगत व्यक्त केले. दिपक तळेकर यांनी या ग्रुप मधील अनेक सदस्यांनी सायकलवर हजारो किलोमीटरचा प्रवास केला असून त्यांनी दोन धाम, चार धाम, गड किल्ल्याची परिक्रमा संपूर्ण केल्याचे तळेकर यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महेश पवार संदीप दरवेशवार, सुनील व्यवहारे, रमेश सुरेवार, सय्यद अमजद, अजय रापतवार, रोशन लाड, सनी लखेरा यांनी परिश्रम घेतले.

# आश्वासनाची पूर्ती;ना.पंकजाताई मुंडेंनी मानले केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे आभार



# बर्दापूर ते लोखंडी सावरगांव रस्त्याचे रुंदीकरण होणार;२५० कोटीची तरतूद



मुंबई (सरकार) परळी मतदारसंघातील बर्दापूर ते लोखंडी सावरगांव रस्ता रुंदीकरणाला आता गती येणार असून यासाठी २५० कोटीची तरतूद आराखड्यात करण्यात आली आहे, या कामासाठी जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या वेळेस प्रचार करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सभेत बर्दापुर ते लोखंडी सावरगाव रस्त्याचे रुंदीकरण करावे अशी मागणी केली होती, हा रस्ता अरूंद असल्याने यावर वारंवार अपघात झाले होते, त्यामुळे ही मागणी पुढे आली होती, यावर गडकरी यांनी रस्त्यासाठी लवकरच निधी देऊन काम सुरू करू असे आश्वासन दिलं होते. याच मागणीसाठी ना.पंकजाताईंनी गडकरी यांची दिल्ली येथे भेटही घेतली होती.रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बर्दापूर ते लोखंडी सावरगांव या एकूण १८ किमी लांबीच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतपणे करण्यात आला असून या कामासाठी २५० कोटींचा खर्च अपेक्षित असून तेवढ्या निधीची तरतूद करण्यात या आराखड्यात करण्यात आली आहे. दरम्यान, जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल ना. पंकजाताईंनी गडकरींचे आभार मानले आहेत.

## लिंबागणेश जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत योगदिनानिमित्त विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे

बीड (सरकार): तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.२१ आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे देण्यात आले.मानसिक आरोग्य त्याबरोबरच शारीरिक स्वास्थ्य देखील महत्वाचे असल्याची शिकवण दिली. शाळेच्या निसर्गरम्य प्रांगणात व प्रसन्न वातावरणात इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना ताडासन, वज्रासन, भुजंगासन,पश्चिमोत्तानासन,

त्रिकोणासन,पवनमुक्तासन, सुर्य नमस्कार आदी योगासने



करण्यात आली.विद्यार्थ्यांना अनुलोम -विलोम, कपाल भाती,भ्रामरी,भस्त्रीका,नाडी शोधन, प्राणायाम आदींची माहिती देण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, सहशिक्षक आगम एस.बी.,चौरे बी.बी.सहशिक्षिका श्रीमती माधुरी कुलकर्णी,आदी शिक्षकवृंद उपस्थित होते. योग प्रशिक्षण व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अमर पुरी यांनी केले.

## योग प्रशिक्षकांना ना.पंकजाताई मुंडे यांच्या तर्फे गौरवपत्र

परळी (सरकार): देशाचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठींबा दिला होता. त्यानुसार दरवर्षी २१ जून या दिवशी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला जातो.

त्या अनुषंगाने लोकनेत्या मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब आणि मा. खा. डॉ प्रीतमताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली

परळी वैजनाथ शहर भाजपा व जिजामाता गार्डन क्लब, पतंजली योग समिती, वैद्यनाथ बँक यांच्यावतीने जिजामाता गार्डन येथे योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी अनेक वर्ष परळी शहरांमध्ये योगाचे प्रशिक्षण देणाऱ्या विविध ठिकाणी योग पुरस्कार प्राप्त योगशिक्षिका सौ. सरला उपाध्याय, आणि त्यांच्या सहशिक्षिका सौ. शालिनी बोधे यांचा भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष सौ. उमाताई समशेट्टी यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांचे गौरवपत्र व शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सौ समशेट्टी यांनी योगा बद्दल माहिती दिली तसेच योगाचे महत्त्व सांगितले. दररोज योग करण्याचे अनेक फायदे आहेत. शरीर आणि मन शांत करण्यासाठी योग खूप फायदेशीर मानला जातो. योग केल्याने आपल्या शरीराला ऊर्जा मिळते. स्नायूंची ताकद वाढते. तसेच यामुळे तुमची श्वसन, ऊर्जा आणि चैतन्य सुधारते. यावेळी सोमेंद्र शास्त्री यांना स्व. वंदना पारसेवार प्रतिष्ठान तर्फे सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, भाजपाचे ज्येष्ठ नेते विकासराव डुबे, वैजनाथ ताटीपामल, नागनाथ पारसेवार, राजेश कोलवार, परळीतील प्रसिद्ध व्यापारी गुलाबराव शेटे, सुभाष तोतला, ब्रिजलाल मुंदडा, चंद्रकांत मुंडे, काकानी सर, रेपे सर, चित्राताई देशपांडे, यांच्यासह महिला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती होती.



## समाधानी जीवन व मन:शांती साठी योगसाधना आवश्यक-न्यायाधिश आनंद यावलकर



बीड (सरकार): आंतरराश्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून दिनांक २१.०६.२०२५ रोजी जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, बीड यांचे वतीने जिल्हा न्यायालय आवारात योगसाधना शिबीर घेण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड न्यायालयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधीश श्री. आनंद यावलकर साहेब होते. यावेळी अध्यक्षीय भाशणात त्यांनी समाधानी जीवन व मनःशांती साठी योगसाधना आवश्यक आहे. दैनंदिन धावपळीच्या जीवनात प्रत्येकाने स्वतःसाठी वेळ काढुन योग प्राणायाम करणे आवश्यक आहे असे सांगितले. योग शिबीरात प्रमुख पाहुणे योगप्रशिक्षक म्हणुन श्रीमती. संगिता देशपांडे जिल्हा न्यायालयाचे माजी प्रबंधक व श्रीमती.पानसंबळ मॅडम यांनी उपस्थितांना योगाचे प्रशिक्षण दिले. सदर योगसाधना शिबीरात मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी तसेच वकील संघाचे अध्यक्ष ॲड. येवले, वकील संघाचे पदाधिकारी व वकील संघाचे सदस्य, तसेच लोकअभिरक्षक कार्यालयाचे प्रमुख ॲड.श्री. दगडखैर, रिटेनर लॉयर ॲड.श्री.आंधळे यांचे सह जिल्हा न्याायालयाचे प्रबंधक श्री.झेंड, अधिक्षक व इतर न्यायालयीन कर्मचाायांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. सुत्रसंचालन श्री.ओंकार नाईकवाडे यांनी केले. आभारप्रदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती. रेणुका एम. सातव यांनी केले.

## राष्ट्रीय महामार्गाच्या मंजुरीचे श्रेय घेणाऱ्या पुढाऱ्यांनी अपघातात बळी गेलेल्यांची जबाबदारी घ्यावी-डॉ.ढवळे

बीड (सरकार) : भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांच्या आदेशानुसार २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बीड जिल्ह्यातील लातुर ते लोखंडी सावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव १८ किलोमीटर रस्त्यावरील उर्वरित लांबीचे चौपदीकरण आणि माजलगाव ते केज दरम्यान धारूर जवळच्या ब्लॅक स्पॉट ठरलेल्या घाट या दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटी रूपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. आम्हीच कामे केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी यांच्या कडुन मंजूर करून आणली म्हणत



नितिन गडकरी यांचे आभार मानत माजी खासदार प्रितमताई मुंडे व विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनावणे यांची श्रेयवादासाठी दैनिकात पत्रकबाजी सुरू आहे.

याचवेळी गेल्या वर्षी २०२४ मध्ये अपघातात ४५९ जणांनी आपला जीव गमावला तर ३९७ जण गंभीर जखमी झाले होते. तर जानेवारी २०२५ ते मे २०२५ या गेल्या ५ महिन्यात २५९ अपघातात १५७ जण मृत्युमुखी पडले असून व १०२ जण गंभीर जखमी झाल्याची शासन दरबारी नोंद आहे. निकृष्ट रस्ते, गुळगुळीत रस्त्यावरील गतिरोधकांचा अभाव, दिशादर्शक फलक नसणे आणि रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृतीच्या नावाखाली फोटो सेशन यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे.जिल्ह्यातील महामार्गावर ४० ब्लॅक स्पॉट आहेत.याबाबतीत मात्र केवळ सामाजिक कार्यकर्ते यांनीच वारंवार प्रशासन व सरकारला निवेदन,आंदोलनाद्वारे जागे करण्याचा प्रयत्न केला असुन आज श्रेयवादासाठी धडपडणारे लोकप्रतिनिधी मुग गिळून गप्प होते त्यामुळे या अपघातांची जबाबदारी सुद्धा त्यांनी घ्यायला हवी अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.

## पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, पाली येथे योग दिन उत्साहात साजरा

बीड (सरकार): पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, पाली येथे २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन योगसाधक राज्य आदर्श शिक्षक पंढरीनाथ क्षीरसागर सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायाम करुन उत्साहात साजरा करण्यात आला.


योगसत्रात विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, अनुलोम-विलोम, भ्रामरी प्राणायाम आदी आसनांचे सराव उत्स्फूर्तपणे केले. शारीरिक लवचिकता, मनाची एकाग्रता आणि तणावमुक्त जीवनासाठी योग कसा उपयुक्त आहे यावर मार्गदर्शन झाले. काही विद्यार्थ्यांनी योगावर भाषणे, कविता व गीत सादर केली.

या कार्यक्रमासाठी शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये तळेकर सर, आघाव सर, राठोड सर, पायके सर, डोंगर सर, साळुंखे सर, काब्दे मॅडम, मुंडे मॅडम, म्हेत्रे मॅडम, हंगे मॅडम, सांगळे मॅडम, वाकचौरे मॅडम, खाडे मॅडम, मुळे मॅडम, जगताप मॅडम, सवई मॅडम व जाधव मॅडम यांनी विशेष उपस्थिती लावली.

## श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे मंगळवारी होणार पंढरपूरकडे प्रस्थान

भगवानगड (सरकार): महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे मंगळवार दि.२४ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे.

श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान मंगळवारी दुपारी ठीक ३ वाजता होणार आहे. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, पिंपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहोचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, बोरकिन्ही ग्रामस्थ, भाग्येश्वर संस्थान तरडगव्हण, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान छत्रपती संभाजीनगर-पैठण-आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, संत भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली निघणाऱ्या या भव्यदिव्य पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी भगवानगड परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती राहणार आहे.



## योग दिन उत्साहात साजरा

## ताण तणावापासून मुक्त राहण्यासाठी योगासने करणे महत्त्वाचे -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड (सरकार)धकाधकीच्या जीवनात ताणतणावातून तणावमुक्त राहण्यासाठी शारीरिक व मानसिक क्षमता कायम राहावी यासाठी दररोज योगासने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

योग हा पारंपारीक पद्धतीने पाच हजार वर्षापासून चालत आला असून पूर्वी वडीलधारी मंडळी योगाच्या माध्यमातून स्वतःला निरोगी व तणावमुक्त ठेवण्यासाठी योगासने, ध्यान साधना करत असत. विद्यार्थ्यांना आपले ध्येय साध्य करण्यासाठी व एकाग्रता साधण्यासाठी ध्यान धारणा (मेडीस्टेशन) करणे ही काळाची गरज झाली असून शारिरीक व मानसिक स्वास्थ्य निरोगी ठेवण्यासाठी ध्यान साधनेचा जीवनात नियमित उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांना केले. जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा शिक्षण विभाग, विविध योग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे इनडोअर हॉलमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योगदिनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येतो. माणसाच्या



जीवनात योगाचे अत्यंत महत्त्व असून आजची आपली जीवनशैली बदलल्यामुळे तरूण पिढी नेहमीच तणावाच्या वातावरणात वावरत असते. यापासून मुक्त राहण्यासाठी योगासारखे दुसरे माध्यम नाही. प्रत्येक नागरीकांनी योगा केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी शाळा व महाविद्यालयातील तरूणाने योगा केला पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले. योग दिनाचे औचित्य साधून बीड जिल्हयातील राष्ट्रीय खेळाडू राधा वझे, सुभाषिणी वझे, शिवाजी घोडके व राधा तांबे यांचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी योगगुरू विनायक वझे, विकास गवते, राधा तांबे यांनी उपस्थितांकडून योगासने करून घेतले. प्रोटोकॉल नुसार योगा कार्यक्रम संपन्न होत असतांनी शेवटी पूर्णवाद स्पोर्टस् ॲण्ड हेल्थ प्रमोशन अकॅडमी, बीड च्या योग खेळाडू यांनी व शिवाजी घोडके, राधा तांबे यांनी योग प्रात्यक्षिकांचे प्रदर्शन केले.

या योग दिनाच्या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वासुदेव सोळंके, निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, तहसिलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, जिल्हा कोषागार अधिकारी लहु गळगुंडे, जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी माध्य. विभाग, संजय पंचगल्ले, प्रियाराणी पाटील, प्राथमिक विभाग, भगवान फुलारी जिल्हा आयुष अधिकारी, आनंद कुलकर्णी, पुरूषोत्तम पिंगळे, कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग रविंद्र तोंडे, जेष्ठ क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा.जे.पी. शेळके, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, भगवान सोनवणे, रंगनाथ राऊत, सहाय्यक जिल्हा उपनिबंधक अशोक कदम, जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, विविध कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी शहरातील शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, क्रीडा संघटक, नागरिक, खेळाडू, पत्रकार, व्यवसासिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

योग दिनाचे यशस्वी आयोजन होणे कामी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांचे मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिष राठोड, अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक, धनेश करांडे, प्रिती काळे, मंगेश वडमारे, गणेश वीर यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)